**नेमणुक मान्यता आदेश**

43

जा.क्रं./जिपजा/शिक्षण/प्राथ-६/२०१४
कार्यालय जिल्हा परिषद जालना
दिनांक :- /१२/२०१४.
03-01-2015

प्रति,

अध्यक्ष / सचिव / मुख्याध्यापक,
मत्स्योदरी शिक्षण संस्था जालना संचलित,
मत्स्योदरी ज्ञानमंदिर प्राथमिक शाळा,
अंबड जि.जालना.

विषय :- कर्मचारी नेमणूकीस वैयक्तिक मान्यता देणे बाबत. **(सेवा सातत्य)**

संदर्भ :- १. या कार्यालयाचे वै.मान्यता आदेश क्रं. जिपजा/शिक्षण/प्रा-६/२०१३/४९५१ दिनांक २०/१२/२०१३.
२. आपला प्रस्ताव दिनांक ११/०२/२०१४.

उपरोक्त संदर्भिय प्रस्तावास अनुसरुन शाळेच्या आवश्यकतेप्रमाणे संस्थेने नेमलेल्या कर्मचाऱ्यांना शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमाच्या तसेच खालील दर्शविलेल्या अटीच्या अधीन राहून वेयक्तिक मान्यता (**सेवासातत्य**) देण्यांत येत आहे.

१. आपल्या शाळेतील काही वर्ग / तुकडया अनुदान प्राप्त असून त्यासाठी आवश्यक कर्मचाऱ्यांस संस्थेस शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी मान्यता दिलेली आहे. त्यापेक्षा जादा नेमलेल्या कर्मचारी यांच्या वेतनाची जबाबदारी शाळेवर / संस्थेवर राहील.
२. कर्मचारी अनुसूची मंजुरी आदेशात विहीत केलेले प्रशिक्षित प्रमाण राखण्यात यावे.
३. शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासाठी विहित केलेल्या घडयाळी तासिके प्रमाणे वेळ सेवा करुन घेणे बाबतची जबाबदारी संस्थेवर / शाळेवर राहील.
४. महाराष्ट्र खाजगी प्राथमिक शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती नियम १९८१ च्या नियम क्रमांक ८ अन्वये) आवश्येकते मागासवर्गीयांचे प्रमाण राखलेले असून, मागासवर्गीय कर्मचारी यांच्या नेमणूका करण्याबाबतची कार्यवाही नियम क्र ८ व ९ अन्वये पूर्ण करण्यात यावी.
५. व्यवस्थापनाने केलेल्या नेमणूका या महाराष्ट्र खाजगी प्राथमिक शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती नियम १९८१ च्या अनुसूची ब मध्ये दिलेल्या शैक्षणिक अर्हता व अनुसूची क मध्ये दिलेल्या वेतनश्रेणीनुसारच) उपलब्ध पदांच्या अधीन राहून करण्यात यावी.
६. या कार्यालयाकडून अतिरिक्त शिक्षक आपणांकडे सामावून घेण्यासाठी पाठविल्यास व त्यानुसार ते अतिरिक्त म्हणून नेमले गेल्यास नेमणूक दिलेल्या शिक्षकास २४ तासाची नोटीस देवून कमी करण्यात येईल. अशी लेखी समज त्यांना देण्यात यावी. व समज मिळाल्याबद्दलची त्यांची स्वाक्षरी आपल्या दफ्तरी ठेवावी.
७. सन २०१३-१४ वर्षात जादा मिळालेल्या वर्ग / तुकडयांसाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता मिळालेली असली तरी जिल्हा नियोजन व विकास मंडळाने आर्थीक तरतूद उपलब्ध करुन दिल्यासच वेतन अदा केले जाईल. सदरील जादा तुकडया अनुदान तत्वावर आल्याचे आदेश मिळाल्यानंतरच कर्मचाऱ्यांची देयके सादर करावीत.

(कृपया : पाठीमागे पहा)